THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH MAY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

*सन १८७२ चा आक्ट ९ वा, ह्याच्या ६९ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करण्याबाबद.*

१. सदरहू आक्टाच्या ६९ व्या कलमानंतर पुढील कलमें दाखल करावीं: तीं येणेंप्रमाणें:—

*हितसंबंध असलेल्या मनुष्यानें पैसा भरून, परहस्तगत होण्यापासून बचावलेल्या स्थावर मिळकतीवरील बोजा.*

"६९ अ. सदरील शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें द्यावयाचा कोणताही पैसा जर, कोणत्याही स्थावर मिळकतींत हितसंबंध असलेल्या कोणत्याही मनुष्याकडून देण्यांत आला असेल, आणि तो पैसा देणें कायद्याअन्वयें ज्या मनुष्यास भाग असेल त्या मनुष्याच्या कसुरीमुळें, ती मिळकत परहस्तगत होण्यापासून बचावण्यासाठीं ह्याप्रमाणें पैसा देणें जरूरीचें असेल, आणि त्याप्रमाणें पैसा दिल्यानें ती मिळकत सदरहूप्रमाणें बचली असेल, तर, तो पैसा देणाऱ्या मनुष्यास, कोर्ट ठरवील त्या दराच्या व्याजासहित, तो पैसा भरून मिळण्यासाठीं सदरहूप्रमाणें बचलेल्या मिळकतीवर बोजा घालण्याचा हक्क प्राप्त होईल.

जर ती मिळकत सदरहूप्रमाणें परहस्तगत झाली असती तर तीवरचे जे बोजे व तींतले जे हक्क व्यर्थ झाले असते, त्या सर्व बोजांवर व हक्कांवर सरदहू बोजाची अग्रता राहील; आणि तो बोजा, सदरहू मिळकत सदरहूप्रमाणें परहस्तगत झाली असती तरी जे बोजे व जे हक्क कायम राहिले असते, त्या सर्व बोजांस व हक्कांस पात्र समजला पाहिजे.

*सामाइक हितसंबंध असलेल्या दोन किंवा जास्त इसमांपैकीं एकानें पैसा भरून बचावलेल्या स्थावर मिळकतीवरील बोजा.*

"६९ ब. दोन अगर जास्त मनुष्यांचा कोणत्याही स्थावर मिळकतींत सामाइक हित-संबंध असून त्यांपैकीं एक मनुष्य जर, त्या मिळकतीसंबंधानें जो कोणताही पैसा देण्यास ते मनुष्य एकाजतींएकामतीं व निरनिराळे पात्र असतील, अगर जो त्यांनीं कायद्याप्रमाणें किंवा इक्विटीच्या रीतीनें समसमान अगर विवक्षित प्रमाणाच्या हिस्सेरसीनें दिला पाहिजे असें असेल, तो पैसा ती मिळकत बचावण्यासाठीं देईल, तर, ह्याप्रमाणें पैसा देणाऱ्या मनुष्यास, सदरहूप्रमाणें दिलेल्या रकमेचा जो हिस्सा भरण्यास सदरीं सांगितलेल्या दोन मनुष्यांपैकीं दुसरा मनुष्य सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र होता

किंवा त्या रकमेचे जे हिस्से भरण्यास सदरीं सांगितलेल्या जास्त मनुष्यांपैकीं इतर मनुष्यें सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र होतीं, तो हिस्सा किंवा ते हिस्से कोर्ट ठरवील त्या दराच्या व्याजासहित भरून घेण्यासाठीं, त्या मिळकतींतल्या त्या दुसऱ्या मनुष्याच्या अगर इतर मनुष्यांच्या हितसंबंधावर बोजा घालण्याचा हक्क प्राप्त होईल.

हितसंबंध असलेल्या मनुष्यांच्या विनंतीवरून पैसा देऊन बचावलेल्या स्थावर मिळकतीवर बोजे.

"६९ क. जर कोणताही मनुष्य, कोणत्याही स्थावर मिळकतींत हितसंबंध असलेल्या कोणा इसमाच्या सहीसुद लेखी विनंतीवरून, ती मिळकत परहस्तगत होण्यापासून बचावण्यासाठीं, तो इसम त्या मिळकतीसंबंधाचा जो कोणताही बोजा किंवा मागणी देण्यास कायद्यावरून बांधलेला असेल, तो बोजा किंवा ती मागणी देईल तर, ह्याप्रमाणें पैसा देणाऱ्या मनुष्यास, सदरहूप्रमाणें दिलेला पैसा, कोर्ट ठरवील त्या दराच्या त्यावरच्या व्याजासहित भरून मिळण्यासाठीं, सदरहूप्रमाणें बचावलेल्या मिळकतीवर बोजा घालण्याचा हक्क प्राप्त होईल.

ज्या मनुष्याचा बोजा किंवा मागणी सदरहूप्रमाणें देण्यांत आली असेल त्या मनुष्याचा तो बोजा अगर ती मागणी देण्याच्या वेळीं जो अग्रतेचा हक्क होता तसाच हक्क, सदरहूप्रमाणें बोजा घालण्यास हक्क प्राप्त झालेल्या मनुष्यास, त्या बोजाच्या संबंधानें, स्वतः-च्या आणि त्या मिळकतींत हितसंबंध असलेल्या इतर मनुष्यांच्या दरम्यान, प्राप्त होईल.

सदरील शेवटच्या तीन कलमांअन्वयें बोजा असण्याविषयीं व तो किती आहे त्याविषयीं ठराव करून घेण्यासाठीं दावा.

"६९ ड. जो कोणताही मनुष्य गेल्या शेवटच्या तीन कलमांपैकीं कोणत्याही कलमाअन्वयें कोणत्याही मिळकतीवर बोजा घालण्याचा आपला हक्क सांगत असेल, त्याला, असा बोजा असल्याबद्दल व तो किती आहे त्याबद्दल ठराव करून घेण्यासाठीं त्या मिळकतीच्या मालकावर दावा चालवितां येईल.

(मिळकत) बोजारहित विकण्याचा सरकारचा हक्क कायम राखण्याबाबद.

"६९ इ. कलमें ६९ अ, ६९ ब व ६९ क ह्यांतल्या कोणत्याही मजकुरावरून, जमीन महसुलाची बाकी व इतर सरकारी मागण्या वसूल करण्याच्या संबंधानें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें, कोणतीही इस्टेट कोणत्याही प्रकारचा बोजा न राहतां विकण्याच्या सरकारच्या हक्कास बाध येतो असें समजूं नये; आणि सदरील कलमांमध्यें कांहीं-ही सांगितलेलें असलें तरी, त्यांत सांगितल्या प्रकारचा कोणताही बोजा, स्थावर मिळकत किंमत देऊन इमानें इतबारें तबदील करून घेणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या विरुद्ध, खालीं निर्दिष्ट केलेला प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगाच्या बाबतींत चालणार नाहीं: तो प्रसंग असा कीं, असा बोजा असल्याचें आणि तो किती आहे तें ज्यांत कबूल केलेलें आहे अशी जी कबुलायत त्या तबदील करून घेणाऱ्या मनुष्याच्या पूर्वींच्या सत्ताधिकाऱ्यानें करून दिलेली असेल ती कबुलायत, अगर सदरहू गोष्ट योग्य हुकुमतीच्या कोणत्याही कोर्टाच्या ज्या हुकुमनाम्यांत ठरविलेली असेल त्याची दाखलेसूद नकल, ती मिळकत अशा तबदील करून घेणाऱ्यास तबदील करून देण्याच्या आधीं, दस्तऐवज नोंदण्यासाठीं त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें ब्रिटिश हिंदुस्थानांत नोंदलेला किंवा नोंदलेली असली पाहिजे.

मात्र, सदरहूप्रमाणें नोंदणी झालेली असली तरी, ती मिळकत ज्या कोणत्याही मनुष्यानें किंमत देऊन इमानें इतबारें तबदील करून घेतलेली असेल, त्यानें जर कोर्टाची खात्री होईल अशा प्रकारें असें शाबीत केलें कीं त्यानें खरेदीचा पैसा दिला तेव्हां तो बोजा असल्याची त्याला खरोखर माहिती नव्हती आणि वाजवी प्रयत्न करूनही त्या बोजाचा त्याला शोध लागला नसता, तर त्याविरुद्ध तो बोजा कायदेशीर गणला जाणार नाहीं.

खुलासा.—ह्या कलमाचा अर्थ करतांना, "खरेदीचा पैसा" ह्यांत, ती मिळकत तबदील करून घेण्यासाठीं दिलेल्या किंमती मोबदल्याचा समावेश होतो."

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

इंग्लंडच्या व आयर्लंडच्या कोर्टांनीं मान्य केलेल्या इक्विटीच्या जुन्या नियमाच्या आधारें ब्रिटिश हिंदुस्थानच्या कायद्यांमध्यें अशा प्रकारचे ठराव दाखल करण्याचा ह्या मसुद्याचा उद्देश आहे कीं, त्यांच्या योगानें स्थावर मिळकतीचा परहस्तगत होण्यापासून बचाव व्हावा ह्या उद्देशानें कोणत्याही मनुष्याकडून पैसा भरण्यांत आल्याकारणानें त्या मिळकतीचा तसा बचाव झाला तर, त्या मनुष्यास, ह्याप्रमाणें दिलेल्या पैशासंबंधानें, विवक्षित हकीकत असतांना, त्या मिळकतीवर लीयन अगर बोजा घालतां यावा.

सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट, कलम ६९, ह्यांत असा ठराव आहे कीं, जो कोणताही पैसा ज्या मनुष्यानें देणें कायद्यावरून भाग आहे तो पैसा त्या मनुष्यानें न दिल्या कारणानें जर तो देण्याशीं संबंध असलेल्या दुसऱ्या कोणा मनुष्यानें तो दिला, तर, त्या दुसऱ्या मनुष्यास त्या पहिल्या मनुष्याकडून तो पैसा भरून मिळण्याचा हक्क प्राप्त होतो ह्याप्रमाणें, ज्या मनुष्यानें पैसा दिलेला असेल, त्याला, ह्या कलमांत सांगितल्याप्रमाणें हकीकत असेल त्या प्रसंगीं, त्यानें तो पैसा ज्या मनुष्याकरितां दिलेला असेल, त्याकडून तो वसूल करण्याचा हक्क प्राप्त होतो, परंतु तो पैसा दिल्यानें जी मिळकत बचली असेल त्या मिळकतींतून तो पैसा वसूल करण्याचा हक्क प्राप्त होत नाहीं. असा हक्क देण्यासाठीं कायदा करणें योग्य होईल किंवा नाहीं हा प्रश्न, सदरहूप्रमाणें पैसा दिल्यानें कोणत्या प्रकारचे व किती हक्क उत्पन्न होतात ह्या गोष्टीविषयीं ज्या कांहीं मुकदम्यांच्या संबंधानें विचार करावा लागला होता त्या मुकदम्यांत निरनिराळ्या कोर्टांनीं निरनिराळे ठराव केल्या कारणानें, हिंदुस्थान सरकारापुढें आलेला आहे. कलकत्त्याच्या व अलाहाबादच्या हायकोर्टांच्या फुल बेंचांनीं असा ठराव केला आहे कीं, कोणत्याही इस्टेटींत हितसंबंध असलेला जो कोणताही मनुष्य, ती इस्टेट बचावण्यासाठीं पैसा देतो, त्या मनुष्याला त्या मिळकतीवर बोजा घालतां येतो असा इक्विटीचा साधारण नियम नाहीं, आणि ह्मणून, कायद्यांत उलट ठराव असल्याच्या अभावीं, ज्या कोणत्याही हिस्सेदारानें सगळा महसूल देऊन इस्टेटीचा विक्रीपासून बचाव केला असेल त्याला, त्यानें ह्याप्रमाणें पैसा दिला ह्या कारणावरून, महसूल देणाऱ्या आपल्या सह-हिस्सेदारांच्या हिशांवर बोजा प्राप्त होत नाहीं; परंतु, ह्या ठरावांपैकीं कोणताही ठराव कलकत्ता व अलाहाबाद हायकोर्टांच्या फुलबेंचांतील सर्व जज्जांच्या अनुमतानें झालेला नसून त्या जज्जांपैकीं थोड्या जज्जांचें जें उलट मत पडलें होतें, तें मुंबई व मद्रास हाय कोर्टांच्या डिव्हिजनल बेंचांस पसंत पडलें आहे. अशी स्थिति असल्या कारणानें त्या विषयासंबंधानें कायदा करण्याची योजना करण्याचें ठरविलें आहे. ह्या मसुद्याच्या ठरावांबद्दल एवढा मात्र खुलासा करणें जरूर वाटतें कीं, जमीनमहसुलाची अगर इतर कोणत्याही सरकारी मागणीची बाकी वसूल करण्यास मिळकत कोणताही बोजा नसतां विकण्याचा जो सरकारचा हक्क, त्याचा ह्या मसुद्यांत बचाव करणें जरूर दिसलें आहे.

तारीख २० माहे फेब्रुआरी सन १८९६.

(सही) अलेक्झांडर एड्वर्ड मिलर.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## एज्युकेशनल डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरें, मुंबई, तारीख १२ माहे मार्च सन १८९६.

नंबर ९६३.—सरकारचा जाहिरनामा नंबर १०७, तारीख १६ माहे जानेवारी सन १८९५, ह्यास अनुलक्षून, कमी दर्जाच्या सरकारी नोकरीच्या जागा उमेदवारांस देण्यासंबंधानें व्यवस्था करण्याबद्दलच्या नियमांपैकीं ३ ऱ्या नियमाची खालीं लिहिल्याप्रमाणें सुधारलेली रकम (२), लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केली आहे:—

"(२) वैकल्पिक विषयांपैकीं, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र (बाऑलजी), शेतकी, चित्रकला (ड्रॉइंग) व हस्त-कौशल्य ह्यांपैकीं कोणत्याही दोन विषयांत त्यांची परीक्षा उतरली असली पाहिजे; मात्र, जमजेटजी-जीजीभाई-स्कूल-आफ्-आर्ट येथील दुसऱ्या ग्रेडची परीक्षा ज्या विद्यार्थ्याची उतरली असेल, अशा विद्यार्थ्याची, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र, शेतकी व हस्तकौशल्य ह्यांपैकीं कोणत्याही एका विषयांत परीक्षा उतरली असल्यास तो सदहू नोकरीस लायक होईल; तसेंच, हायस्कुलांतील शेतकीच्या वर्गाची अखेरची परीक्षा ज्या विद्यार्थ्याची उतरली असेल, अशा विद्यार्थ्याची, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र, चित्रकला व हस्तकौशल्य ह्यांपैकीं कोणत्याही एका विषयांत परीक्षा उतरली असल्यास तोही लायक होईल; आणि ग्रांट इन् एड कोडच्या जे परिशिष्टाप्रमाणें हस्तकौशल्याचें सर्टिफिकेट ज्या विद्यार्थ्यास मिळालें असेल, त्याची, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र, शेतकी व चित्रकला ह्यांपैकीं कोणत्याही एका विषयांत परीक्षा उतरली असल्यास तोही लायक होईल."

आलीजाह गव्हर्नरसाहेब बहादुर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. डीसी. एट्किन्स,

सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.